कोर्ट विद्यमान श्री विद्यासागर चव्हाण तहसिलदार, ब्रम्हपुरी यांचे कार्यालय

रा.मा.क्र. 05 /एन.ए.पी.-34/2018-2019
मौजा : **देलनवाडी** ता. ब्रम्हपुरी
Edisnic No.1024/2018

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42-अ मधील तरतुदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास दयावयाचा सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, जिल्हा **चंद्रपूर** तालुका **ब्रम्हपुरी** गांव **देलनवाडी** च्या सर्व्हे क्रमांक **100/1/ब** आराजी **0.12 हे.आर पैकी 0.12 हे.आर** क्षेत्रफळ **(9800.00 चौरस मीटर)** या जमिनीच्या भोगवटदाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम 42-अ च्या तरतुदीन्वये **रहिवास** अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास नियोजन प्राधिकरण अधिकरी तथा **मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपुरी** या नियोजन प्राधिकरणाच्या आदेश क्रमांक **/नपब्र/ नियोजन/अकृषक/2018/514 दिनांक 21.09.2018** अन्वये **विकास** परवानगी प्राप्त् केली आहे, ज्यासंबधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न् आहे.

ज्याअर्थी उक्त् जमिनीच्या भोगवटदाराने शासनाला, उक्त् संहितेच्या कलम 47-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्क्म **02 नोव्हेंबर, 2018** रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त् संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त् जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखीत विकास परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त् संहितेच्या कलम-42अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

1) **<u>आकारणी :</u>** उक्त् जमिनीचा भोगवटदार उक्त् जमिनीच्या संबधात या अगोदर वसुली योग्य् असलेल्या आकारणीऐवजी वर उल्लेखीत विकास/बांधकाम परवानगी प्राप्त् झाल्यापासून दिनांक 31 जुलै, 2021 (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये **1.36/-** प्रती चौ.मी. (अक्षरी **एक रुपये छत्तीस पैसे**) या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त् कालावधी संपल्यानंतर, उक्त् संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चीत करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

<u>अनुसूची</u>

अ.क्र.	भुखंड क्रमांक	क्षेत्रफळ (चौ.मी.)	मुळ वार्षिक आकारणी
1	1	271.44	369.00
2	2	564.47	768.00
	एकूण बेरीज	**835.91**	**1137.00**

AREA STATEMENT

1	GROSS AREA OF LAND (0.12 Hect)	1200.00 SQ.MT.
2	Deduction for	
	a) Road Acquisition Area (b) Proposed Road (c) Any Reservation (Grren Belt)	Nil.
	Total Deductions	Nil
3	Remaining Gross Area of Plot (1-2)	1200.00 SQ.MT.
4	Deduction for	
	a) Recreational Open Space as per Regulation	00.00 SQ.MT.
	b) Internal Road	364.09 SQ.MT.
	c) Amenity Space if any (5%)	00.00 SQ.MT.
	Total Deductions (a+b+c)	364.09 SQ.MT.
5	Area Under Plots = (3-4)	835.91 SQ.MT.

2) उक्त् जमिनीचा भोगवटादार उक्त् जमिनीवर वसुली योग्य् असलेले सर्व कर, दर आणि उपकर भरील.

3) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून 30 दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

तहसिलदार ब्रम्हपुरी

4) उक्त् जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त् संहितेच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य् वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम 329 च्या पोट कलम (2) च्या अधिनतेने, त्यास योग्य् वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त् जमीन भोगवटदार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणून चंद्रपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा **दिनांक 03 नोव्हेंबर, 2018** रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

सौ. विनोदीनी उरकुडे

(भोगवटादाराची स्वाक्षरी)
सौ. विनोदीनी मनोहरराव उरकुडे रा. ब्रम्हपुरी

आम्ही जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वत: भोगवटदार म्हणून स्वाक्षरी केलेली आहे ती, अ.ब. ही व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

अ. (साक्षीदारांच्या स्वाक्षरी व पदनामे)
श्री प्रकाशचंद्र हरिकिशन शर्मा रा. ब्रम्हपुरी

ब. (साक्षीदारांच्या स्वाक्षरी व पदनामे)
श्री अनिरुध्द कारु मानकर रा. खेडमक्ता

(विद्यासागर चव्हाण)
तहसिलदार, ब्रम्हपुरी

तहसिलदार सत्यमेव जयते ब्रम्हपुरी

प्रतिलिपी :

1) सहाय्यक संचालक, नगर रचना, मुल्यांकन, प्रशासकीय इमारत क्रं. 2, तळमजला, अ विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर 440 001
2) नगर रचनाकार, चंद्रपूर
3) नियोजन प्राधिकरण अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांना त्यांचे उक्त् आदेशाचे अनुषंगाने माहितीस तथा कार्यवाहीस अग्रेषित.
4) उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, ब्रम्हपुरी यांना उचीत कार्यवाहीस अग्रेषित.
5) दुय्यम निबंधक, ब्रम्हपुरी याना उचीत कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी नियोजन प्राधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, ब्रम्हपुरी यांचे उक्त् आदेशातील **सर्व अटीचे** पालन करावे.
6) तलाठी साजा क्र. 12 ब्रम्हपुरी यांना माहितीस तथा उचीत कार्यवाहीस अग्रेषित. सदर सनदेची नोंद गांव नमुना 2 मध्ये घेऊन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
7) वसुल बाकी नवीस तहसिल कार्यालय, ब्रम्हपुरी यांनी सदर आदेशाची नोंद तालुका नमुना-2 मध्ये घेऊन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.
8) भोगवटादार सौ. विनोदीनी मनोहरराव उरकुडे रा. ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांना माहितीस तथा उचीत कार्यवाहीस अग्रेषित.

तहसिलदार, ब्रम्हपुरी